# History

## Paper III

## इतिहास

## प्रश्नपत्रिका III

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 200**

*Instructions* :— This paper consists of **four (4)** Sections I, II, III and IV. Questions in all these sections are to be answered according to the instructions given in the concerned sections.

**सूचना** : या प्रश्नपत्रिकेत एकूण **चार** (4) भाग I, II, III आणि IV आहेत. प्रत्येक भागात त्या भागाच्या स्वतंत्र सूचना दिलेल्या आहेत.

## SECTION I

## (भाग I)

*Instructions* :—In this section you have to attempt **2** questions (Q. **1** and Q. **2**) in about **500** words each. Each question is assigned **20** marks.

**सूचना** :— या भागामध्ये तुम्हाला प्रत्येकी **500** शब्दांत **2** प्रश्नांची (प्र. **1** व प्र. **2**) उत्तरे लिहायची आहेत. प्रत्येक प्रश्नाला **20** गुण आहेत.

1. State the importance of Archaeology and Anthropology in historical research. Give examples.

   पुरातत्त्वविद्या व मानवशास्त्र यांचे ऐतिहासिक संशोधनातील महत्त्व सांगा. उदाहरणे द्या.

   *Or*/(किंवा)

   What is Feminist History ? Discuss its contemporary relevance.

   'स्त्रीवादी इतिहास' म्हणजे काय ? या इतिहासाच्या समकालीन अर्थपूर्णतेची चर्चा करा.

2. Critically examine the 'Itihas-Puran' tradition of Ancient Indian times.
भारताच्या प्राचीन काळातील 'इतिहास-पुराण' परंपरेचे चिकित्सक परीक्षण करा.

*Or*/(किंवा)

What is meant by 'Urban Revolution' ? Comment on the spread of urbanisation in medieval India.
'नागर क्रांती' यामध्ये काय अभिप्रेत आहे ? मध्ययुगीन भारतातील नागरीकरणाच्या विस्ताराविषयी भाष्य करा.

*Or*/(किंवा)

Do you consider the anti-caste movement in India a cultural revolt ? Substantiate your answer.
भारतातील जातिविरोधी चळवळीला तुम्ही सांस्कृतिक बंड मानता का ? तुमच्या उत्तराचे समर्थन करा.

## SECTION II
## (भाग II)

*Instructions* :—There are **3 (Three)** questions (Q. **3** to Q. **5**) to be answered, each in about **300** words. These questions are based on the electives. Select **One** elective out of **Three** electives and answer all the **3 (Three)** questions given below it. Each question is assigned **15** marks.

**सूचना** :— या भागात **3** (**तीन**) प्रश्नांची (प्र. **3** ते प्र. **5**) उत्तरे प्रत्येकी **300** शब्दांत लिहायची आहेत. हे प्रश्न तुमच्या निवडीच्या पर्यायी विषया/विभागा संबंधी आहेत. या **तीन** पर्यायांपैकी कोणताही **एक** पर्याय-विषय/विभाग-निवडा व त्याखालील सर्व **3** (**तीन**) प्रश्नांची उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाला **15** गुण आहेत.

### Elective I/(विभाग I)

3. Account for the decline of Mauryan Empire.
मौर्य साम्राज्याच्या ऱ्हासाची कारणमीमांसा करा.

4. Write an essay on 'Roman trade' with special reference to trade routes, trade centres and important ports.
व्यापारी मार्ग, व्यापारी केंद्र आणि महत्त्वाची बंदरे यांच्या विशेष संदर्भात रोमन व्यापारावर एक निबंध लिहा.

5. Trace the origin and growth of Shaivism with reference to Ancient India.
प्राचीन भारताच्या संदर्भात शैवसंप्रदायाच्या उदय व विकासाचा मागोवा घ्या.

### Elective II/(विभाग II)

3. 'The Mansabdari system was both the greatest strength and the greatest weakness of the Mughal State.' Comment.
'मनसबदारी पद्धत ही मुघल राज्याचे सर्वात मोठे बलस्थान आणि सर्वात मोठी दुर्बलता होती.' भाष्य करा.

4. Discuss the salient features of Bakhar Literature.
बखर वाङ्मयाच्या वैशिष्ट्यांची चर्चा करा.

5. Critically examine the Maratha-Nizam relations.
मराठा-निजाम संबंधांचे टिकात्मक परीक्षण करा.

### Elective III/(विभाग III)

3. Describe different stages of colonial economy.
वासाहतिक अर्थव्यवस्थेच्या विविध टप्प्यांचे विवेचन करा.

4. What is proto-nationalism ? Explain the term with reference to tribal and peasant insurgencies in India.
राष्ट्रपूर्व राष्ट्रवाद म्हणजे काय ? भारतातील आदिवासी व शेतकरी उठावांच्या संदर्भात ही संकल्पना स्पष्ट करा.

5. Explain how Congress became mass based movement under Gandhian leadership.
गांधीजींच्या नेतृत्वाखाली काँग्रेस जनचळवळ कशी बनली हे स्पष्ट करा.

## SECTION III

## (भाग III)

*Instructions* :—In this Section you have to answer *all* the 9 questions (Q. **6** to Q. **14**) each in about **50** words. Each question carries **10** marks.

**सूचना** :– या भागात **सर्व** 9 प्रश्नांची (प्र. 6 ते प्र. 14) उत्तरे द्यायची आहेत. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर साधारणपणे 50 शब्दांत लिहा. प्रत्येक प्रश्नाला 10 गुण आहेत.

6. Discuss briefly the various theories pertaining to the decline of Indus Valley Civilisation.

सिंधु संस्कृतीच्या ऱ्हासासंबंधीत विविध सिद्धान्तांची संक्षिप्त चर्चा करा.

7. State the importance of Nalanda as one of the international centres for higher education in Ancient India.

प्राचीन भारतातील उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीय केंद्र म्हणून नालंदाचे महत्त्व सांगा.

8. Describe Jain literature of Ancient India.

प्राचीन भारतातील जैन वाङ्मयाचे विवरण करा.

10. Comment on the applicability of the theory of feudalism to the Vijayanagar empire.

विजयनगर साम्राज्यासंदर्भात सामंतशाही सिद्धांताच्या उपयोजिततेवर भाष्य करा.

11. In what way was the revenue system of Chhatrapati Shivaji influenced by that of Malik Ambar ?
छत्रपती शिवाजी महाराजांच्या जमिन महसूल पद्धतीवर मलिक अंबरच्या महसूल पद्धतीचा कशा प्रकारे प्रभाव पडला होता ?

______________________________

______________________________

______________________________

______________________________

12. "The British Revenue Policy in India was an instrument of exploitation." Discuss.

"भारतातील ब्रिटिश महसूल धोरण हे शोषणाचे साधन होते." चर्चा करा.

13. What was the communist perception of the principal contradiction in colonial India ?

कम्युनिस्टांच्या मते वासाहतिक भारतातील प्रमुख विग्रह कोणता होता ?

14. Compare the approaches of Mahatma Gandhi and Dr. Ambedkar regarding the emancipation of Dalits.

महात्मा गांधी व डॉ. आंबेडकर यांच्या दलितमुक्ती संबंधातल्या भूमिकेची तुलना करा.

## SECTION IV

## (भाग IV)

*Instructions* :—Below is a paragraph. Read it carefully and answer the questions (Q. **15** to Q. **19**) following it; each in about **30** words. Each question is assigned **5** (*Five*) marks.

**सूचना** :— खाली एक परिच्छेद दिला आहे. तो काळजीपूर्वक वाचा व त्याखालील प्रश्नांची (प्र. **15** ते प्र. **19**) प्रत्येकी साधारणपणे **30** शब्दांत उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाला **पाच** (**5**) गुण आहेत.

With the subsiding of the mass movement, one era in the Indian freedom struggle was over. It would be wrong, however, to see the Swadeshi movement as a failure. The movement made a major contribution in taking the idea of nationalism, in a truly creative fashion, to many sections of people, hitherto untouched by it. By doing so, it further eroded the hegemony of colonial ideas and institutions. Swadeshi influence in the realm of culture and ideas was crucial in this regard and has remained unparalled in Indian history, except, perhaps, for the cultural upsurge of the 1930s, this time under the influence of the Left.

Further, the movement evolved several new methods and techniques of mass mobilization and mass action though it was not able to put them all into practice successfully. Just as the Moderate's achievement in the realm of developing an economic critique of colonialism is not minimized by the fact that they could not themselves carry this critique to large masses of people, similarly the achievement of the Extremists and the Swadeshi movement in evolving new methods of mass mobilization and action is not diminished by the fact that they could not themselves fully utilize these methods. The legacy they bequeathed was one on which the later national movement was to draw heavily.

The Swadeshi movement was only the first round in the national popular struggle against colonialism. It was, to borrow the imagery used by Antonio Gramsci, an important 'battle' in the long drawn out and complex 'war of position' for Indian independence.

जनचळवळ मंदावल्यावर भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे एक पर्व संपले. अर्थात स्वदेशी चळवळ अपयशी ठरली असे मानणे चुकीचे ठरेल. ज्या जनसमूहांना राष्ट्रवादाच्या भावनेचा स्पर्शच अद्याप झालेला नव्हता, त्यांच्यापर्यंत राष्ट्रवाद सर्जनशीलतेने पोहोचवण्यात स्वदेशी चळवळीचे खरे योगदान सामावलेले आहे. या योगदानामुळे वसाहतवादी संस्था व संकल्पनांच्या धुरीणत्वाला सुरुंग लागला. या अर्थाने संस्कृती व विचारांच्या क्षेत्रातील स्वदेशीचा प्रभाव अत्यंत महत्त्वाचा होता. 1930 च्या दशकातील डाव्या विचारसरणीच्या प्रभावाखालील सांस्कृतिक लाटेचा अपवाद वगळता या प्रभावाला भारताच्या इतिहासात तोड नाही.

या चळवळीतून जनसंघटन आणि जनआंदोलनाच्या नव्या पद्धती व तंत्रेसुद्धा विकसित झाली. हे मात्र खरे की त्या सर्वांचाच यशस्वीरित्या उपयोग ही चळवळ करू शकली नाही. नेमस्तांनी केलेली वसाहतवादाची आर्थिक समीक्षा सामान्यजनांपर्यंत पोहोचवण्यात त्यांना अपयश आले, तरी त्या समीक्षेचे महत्त्व कमी होत नाही. त्याचप्रमाणे जहालांनी आणि स्वदेशी चळवळीने विकसित केलेल्या जनसंघटन व जनआंदोलनाच्या नव्या पद्धती व तंत्रे त्यांना पूर्णांशाने उपयोगात आणता आल्या नसल्या तरी त्यांचे महत्त्व कमी होत नाही. त्यांनी निर्माण केलेला वारसा भावी राष्ट्रीय चळवळीला उपयुक्त ठरला.

स्वदेशी चळवळ ही वसाहतवादाविरुद्धच्या राष्ट्रीय जनचळवळीतील केवळ पहिली फेरी होती. आंतोनिओ ग्रामची यांची भाषा वापरून असे म्हणता येईल की, भारताच्या स्वातंत्र्यासाठीच्या दीर्घकालीन व व्यामिश्र 'भूमिकायुद्धा'तील ती एक महत्त्वाची लढाई होती.

15. In what respect was the Swadeshi movement successful ?
स्वदेशी चळवळ कोणत्या अर्थाने यशस्वी होती ?

16. Do you feel that Swadeshi was a 'cultural' concept also ? Justify your answer.
स्वदेशी ही 'सांस्कृतिक' संकल्पनासुद्धा आहे, असे तुम्हांला वाटते का ? तुमच्या उत्तराचे समर्थन करा.

17. What was the distinction between the moderates and the extremists as shown in this passage ?
या उताऱ्यात दर्शवल्यानुसार नेमस्त आणि जहाल यांच्यात कोणता फरक होता ?

18. Why does the author describe the Swadeshi movement as the first round in the national popular struggle ?

राष्ट्रीय जनचळवळीतील पहिली फेरी, असे स्वदेशी चळवळीचे वर्णन लेखकाने का केले आहे ?

19. What do you understand by the term 'War of Position' ?

'भूमिकायुद्ध' या संज्ञेचा कोणता अर्थ तुम्हांला प्रतीत होतो ?